NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# इंडो-पॅसिफिक रणनीती: भारत-चीन संबंधाच्या (२०१४ ते २०२३) नव्या परिमाणांचा अभ्यास

**रामेश्वर लिंबाजी दिवटे,** संशोधक राज्यशास्त्र विभाग रा ब नारायणराव बोरावके महाविद्यालय,
श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर. ई-मेल – rdiwate296@gmail.com मोबाईल नं. ९४२१६८६३३७.
मार्गदर्शक - **डॉ. मेघराज एकनाथ औटी**

---

**सारांश-**

भारत आणि चीन या आशियातील दोन प्रभावी व उदयनमुख महासत्ता म्हणून पुढे येतांना आपल्याला दिसत आहे. या दोन्ही देशांचे द्विपक्षीय संबंध ऐतिहासिक, राजनीतिक आणि सामाजिक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. दोन्ही देशांमध्ये दीर्घकालीन सीमावाद अस्तित्वात असून २१ व्या शतकात या संबंधांना नव्या भू-राजकीय परिमाणांची जोड मिळाली आहे. विशेषतः इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील वाढती स्पर्धा, सामरीक संतुलन आणि आर्थिक परस्परावलंबन या घटकांमुळे द्विपक्षीय संबंधाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनले आहेत. इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनद्वारे राजनैतिक व आर्थिक प्रभाव वाढविण्याचे प्रयत्नही होताना दिसून येत आहेत, जे भारतासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. २०१४ नंतर भारतही इंडो-पॅसिफिक प्रदेशात एक महत्त्वाची भूमिका बजावत आहे, कारण भारत आपल्या राजनीतिक महत्त्वकांक्षा संतुलित ठेवून चीनच्या वाढत्या प्रभावाला रोखू इच्छितो आणि आपल्या सामरिक हितसंबंधाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करत आहे.

चीनने आपल्या परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून शेजारी देशांसोबत आर्थिक करार, पायाभूत सुविधा विकास आणि धोरणात्मक गुंतवणुकीच्या माध्यमातून प्रादेशिक प्रभाव विस्तारण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रक्रियेला काही अभ्यासकांनी 'स्ट्रिंग ऑफ पार्ल्स' या सामरीक चौकटीत विश्लेषित केले आहे, ज्यामुळे भारताच्या सुरक्षाविषयक व रणनीतिक हितांवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, भारतानेही इंडो-पॅसिफिक क्षेत्रात सक्रिय भूमिका स्वीकारत बहुपक्षीय सहकार्य, सामरिक भागीदारी आणि शक्ती संतुलन यावर भर दिला आहे. प्रस्तुत अध्ययनात २०१४ ते २०२३ या कालखंडात भारत चीन संबंधातील सहकार्य आणि संघर्ष या दोन्ही प्रवाहाचे चिकित्सक विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील चीनच्या वाढत्या प्रभावाला प्रतिसाद देण्यासाठी भारताने अवलंबलेल्या धोरणात्मक उपाययोजनांचाही अभ्यास करण्यात येईल.

**प्रस्तावना-**

इंडो-पॅसिफिक क्षेत्र हे २१ व्या शतकातील जागतिक राजकारण आणि अर्थकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण भूराजकीय अवकाश म्हणून उदयाला आले आहे. या प्रदेशात सुमारे ३८ देशांचा समावेश होतो आणि जगातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या येथे वास्तव्यास आहे. जागतिक सकल देशांतर्गत उत्पन्नात (GDP) या प्रदेशाचा अंदाजे ६२ टक्के इतका लक्षणीय वाटा आहे. त्यामुळे उत्पादन, बाजारपेठ, गुंतवणूक आणि पुरवठा साखळी या सर्व बाबींमध्ये इंडो-पॅसिफिक प्रदेश निर्णायक भूमिका बजावतो. जागतिक सागरी व्यापाराच्या दृष्टीने पाहता, जगातील सुमारे ५० टक्के व्यापार या प्रदेशातील समुद्री मार्गाद्वारे पार पडतो. मलक्का समुद्रधुनीसारखे महत्त्वाचे समुद्री मार्ग (SLOCs) जागतिक ऊर्जा वस्तू वाहतुकीसाठी आवश्यक आहेत. परिणामी, या प्रदेशातील सामरिक स्थैर्य हे जागतिक अर्थव्यवस्थेच्या सुरक्षिततेशी थेट निगडित आहे.

जगातील हिंद महासागर हा एकमेव प्रदेश आणि महासागर आहे ज्याचे नाव एखाद्या राज्याच्या नावावरून ठेवले आहे, म्हणजेच भारत. कोणत्याही देशाची सार्वभौमता अबाधित राखण्यासाठी भू -संरक्षणाबरोबरच सागरी संरक्षणाची देखील आवश्यकता असते, हे तत्व ऐतिहासिक काळापासून लागू आहे आणि अमलात देखील आणले जात आहे. असे म्हणतात की ज्याचा ताबा सागरावर, त्याचा ताबा जमिनीवर. पॅसिफिक महासागर म्हणजे सागरी संरक्षणाचा एक अविभाज्य घटक आहे. भारताच्या दृष्टीने प्रशांत महासागराचे असणारे स्थान हे सामरीकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे कारण या महासागराच्या भोवती चीन व जपान सारखे देश स्थित आहेत. भारताला घेरण्यासाठी प्रशांत महासागरातील इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनने सध्या आपल्या हालचालींना वेग दिला आहे.गत दोन दशकात चीनने इंडो-पॅसिफिक प्रदेशातील विविध देशांबरोबर आर्थिक व पायाभूत सहकार्य वाढविले आहे. विशेषतः Belt and Road Initiative या उपक्रमाच्या माध्यमातून चीनने आशिया, आफ्रिका आणि युरोपमध्ये व्यापार, बंदरे, रेल्वे आणि पायाभूत सुविधा यामध्ये गुंतवणूक वाढविली आहे. परिणामी, चीनचा प्रादेशिक प्रभाव अधिक दृढ झाला आहे. इंडो-पॅसिफिकमधील ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, जपान, भारत आणि सिंगापूर यासारख्या देशांशी चीनचे व्यापारी संबंध व्यापक प्रमाणात विकसित झाले आहेत.

जरी काही देशांमध्ये राजकीय किंवा सामरिक मतभेद आढळतात, तरी आर्थिक परस्परावलंबन कायम असल्याचे दिसून येते. विशेषतः चीन हा ऑस्ट्रेलिया, जपान आणि दक्षिण कोरिया यांचा सर्वात मोठा व्यापार भागीदार राहिला आहे. त्यामुळे राजकीय मतभेद असूनही आर्थिक संबंध टिकवून राहण्याची प्रवृत्ती दिसून येते. मात्र, चीनच्या वाढत्या आर्थिक व सागरी प्रभावामुळे प्रादेशिक शक्ती संतुलनाच्या राजकारणाला चालना मिळाली आहे. परिणामी या प्रदेशात सामरीक स्पर्धा, बहुपक्षीय गटबंधनांची निर्मिती आणि सुरक्षाविषयक नव्या चौकटी उदयास आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर इंडो-पॅसिफिक हा केवळ आर्थिक संकल्पना न राहता भूराजकीय स्पर्धेचा केंद्रबिंदू बनला आहे.

**पारिभाषिक शब्द-**

भारत-चीन संबंध, इंडो-पॅसिफिक, सागरी सुरक्षा, शक्ती संतुलन, नव-वास्तववाद.

**उद्दिष्टे-**

१) इंडो-पॅसिफिक रणनीतीची संकल्पना व तिचे महत्त्व स्पष्ट करणे.
२) २०१४ ते २०२३ या कालखंडात भारत-चीन संबंधांमध्ये झालेले प्रमुख बदल अभ्यासणे.
३) प्रादेशिक सुरक्षेवर इंडो-पॅसिफिक रणनीतीचा परिणाम अभ्यासणे.

**गृहितके-**

१) २०१४ ते २०२३ या कालखंडात इंडो-पॅसिफिक रणनीतीमुळे भारत-चीन संबंधांमध्ये स्पर्धात्मकता वाढली आहे.
२) इंडो-पॅसिफिक धोरणामुळे दोन्ही देशांतील सामरिक अविश्वास वाढला आहे.
३) बहुपक्षीय गटांमधील सहभागामुळे चीन-भारत संबंधांमध्ये शक्ती संतुलनाचे राजकारण वाढले आहे.

**विषय विवेचन-**

भारत हा इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील आपले अस्तित्व वाढवण्यासाठी उत्सुक आहे कारण चीन सोबत भारताची वाढत चाललेली भूराजकीय आणि भूआर्थिक वितुष्ट होय. भारत या क्षेत्रातील एक महत्त्वाचा देश आणि आर्थिक शक्ती असल्याने इंडो-पॅसिफिक क्षेत्रात आपला दबदबा वाढवण्यासाठी भारत या क्षेत्रातील देशांशी व्यापारी हितसंबंध वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करत आहे. भारताला जर इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील चीनचा प्रभाव कमी करायचा असेल तर या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करावी लागणार आहे. इंडो-पॅसिफिक मध्ये भारताची आर्थिक स्थिती वाढविण्यासाठी आसियानसह भारताचे आर्थिक संबंध वाढविणे महत्त्वाचे आहे. इंडो-पॅसिफिकचे राजकारण हे BRI व विशेषतः २१ व्या शतकातील सागरी रेशीम मार्गाची घोषणा चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी केल्यापासून जलद गतीने बदलत आहे. असे झाल्यामुळे या प्रदेशात भारताची भूमिका आणि वाढता प्रभाव यामुळे दोन देशांमध्ये शर्यत वेगवान झाली आहे. चीनने २१ व्या शतकातील एमएसआर ची घोषणा केल्यापासून भारताने इंडो-पॅसिफिकमध्ये आपल्या क्रियाकलापामध्ये जोमाने वाढ केली आहे. चीनने जीबुतीमध्ये ओबॉकमध्ये आपला पहिला परदेशी लष्करी तळ आणि पाकिस्तान मधील ग्वादर, केनियामधील लामू, मोझाबीकमधील मापुटी, श्रीलंकेतील हंबनटोटा आणि कोलंबो, बांगलादेशातील चितगाव, म्यानमारमधील क्युकप्यू अशी काही बंदरे एमएसआर च्या स्थापनेपासून बांधण्यात यश मिळविले आहे. चीनच्या या कृती आपल्याला जरी केवळ व्यापार आणि आर्थिक आकांक्षावर आधारित असल्याचे वाटत असले तरी आपण हे विसरू शकत नाही की बंदरांचे नौदल तळात रूपांतर करणे खूप सोपे असते. चीन मोत्यांच्या माळेसारखे भारताला इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चारही बाजूंनी घेरण्याचा प्रयत्न करत आहे. कंबोडिया पासून सुरू होऊन बांगलादेश, श्रीलंका, मालदीव, म्यानमार व पाकिस्तानातून होऊन सुदान पर्यंत जात आहे. जर या रस्त्याला जोडून बघितले तर असे दिसते की हा रस्ता भारताला चारही बाजूंनी घेरत आहे. चीन स्ट्रिंग ऑफ पर्ल्स धोरणअंतर्गत या सर्व देशात पोर्ट व बंदरे यावर आपले बेस बनवत आहे, जे भारतासाठी इंडो-पॅसिफिक क्षेत्रात मोठे आव्हान आहे. भारताने चीनच्या एमएसआरला तोंड देण्यासाठी आणि त्याचा प्रभाव कमी करण्यासाठी मौसम, सागर, इंडियन ओशन नेव्हल सिम्पोजियम, क्वाड,बिम्सटेक, आणि अनेक द्विपक्षीय प्रकल्प असे अनेक धोरणात्मक प्रकल्प आणलेले आपणास दिसून येत आहेत. भारत-चीन भविष्यातील संबंध हे भारताच्या SAGAR,QUAD आणि AAGC या तीन महत्त्वाच्या धोरणांमुळे परिभाषित होतील.

इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील चीनच्या वाढत्या भूराजकीय अनिश्चिततेतून निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी ऑस्ट्रेलिया, जपान, अमेरिका आणि भारताने २००६ साली क्वाड ची स्थापना केली. परंतु क्वाड हे इंडो-

पॅसिफिक क्षेत्रातील रणनीतिक व आर्थिक सहयोग वाढविण्यासाठी कार्य करणारे संघटन आहे. जपान आणि चीन ऐतिहासिक दृष्टीने एक दुसऱ्यांचे विरोधी आहेत, अमेरिका आणि चीन यांचे संबंध विरोधपूर्ण राहिले आहेत. चीन व ऑस्ट्रेलिया यांचेही संबंध तणावपूर्ण राहिले आहे त्यामुळे क्वाडला चीन विरोधी संघटना म्हणून पाहिले जाते. इंडो -पॅसिफिक क्षेत्राला स्वतंत्र आणि मुक्त ठेवण्यासाठी क्वाडची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. भारताची या क्षेत्रावर मजबूत पकड आहे त्यामुळे क्वाड मधील सर्व देशांसाठी भारताची स्थिती कूटनितिक आणि सामरिक स्वरूपात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भारताचा चीन बरोबर असलेला सीमावाद पाहता क्वाड भारतासाठी एक महत्त्वपूर्ण सहकारी बनला आहे. क्वाड इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या वाढत्या प्रभावाला कमी करण्यासाठी रणनीती आखत असतो. त्यामुळे इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीन क्वाडला आपल्या विरुद्ध एक कट सांगत आला आहे.

इंडो-पॅसिफिक क्षेत्र भारतासाठी नेहमीच अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले आहे. भारताची इंडो-पॅसिफिक रणनीती दोन स्तंभावर आधारित आहे. पहिला स्तंभ म्हणजे या क्षेत्रात भारताने आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांना बळकटी देणे आणि त्याचबरोबर समान विचारसरणी असलेल्या देशांसोबत मजबूत भागीदारी निर्माण करणे. यामुळे या क्षेत्रात भारताच्या राष्ट्रीय क्षमतांमध्ये वाढ होऊन त्यांचा प्रभावही वृद्धिंगत होत आहे. भारताच्या इंडो-पॅसिफिक रणनीतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१८ मध्ये सिंगापूर येथे झालेल्या भाषणात सागर(SAGAR) या तत्त्वाच्या माध्यमातून स्पष्ट केले. या चौकटीत भारताने आसियान देशांना मध्यवर्ती स्थान दिले आहे. आसियानला केंद्रीयता प्रदान करून भारताने प्रादेशिक स्थैर्य आणि संवादाधिष्ठित सहकार्यावर भर दिला आहे. भारताने सागरी सुरक्षेच्या दृष्टीने अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, व्हिएतना आणि इतर भागीदार राष्ट्रांसोबत संयुक्त नौदल सराव आणि सामरिक संवाद वाढवले आहेत.२०१९ मधील G -20 शिखर परिषद आणि त्याच काळातील भारत-अमेरिका-जपान त्रिपक्षीय बैठका या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरल्या. याच कालखंडात भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने इंडो-पॅसिफिक विभाग स्थापन करून या धोरणाला संस्थात्मक आधार दिला.

इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील भारताची रणनीती शांततापूर्ण, मुक्त, खुला आणि सर्वसमावेशक इंडो-पॅसिफिक निर्माण करण्याची आहे. भारताची इंडो-पॅसिफिक संकल्पना आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यापासून अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत विस्तारलेली आहे. या क्षेत्रात कोणत्याही एका राष्ट्राचे वर्चस्व स्वीकारण्यास भारत तयार नाही. परिणामी, भारत-ऑस्ट्रेलिया-फ्रान्स तसेच भारत-ऑस्ट्रेलिया-इंडोनेशिया यासारख्या त्रिपक्षीय सहकार्य उपक्रमाद्वारे चीनच्या वाढत्या प्रभावाला संतुलित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा प्रकारे भारताची इंडो-पॅसिफिक रणनीती ही शक्तीसंतुलन, सागरी सुरक्षा, बहुपक्षीयता आणि सर्वसमावेशक विकास या चार प्रमुख घटकांवर आधारित असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**निष्कर्ष-**

२०१४ ते २०२३ या कालखंडात इंडो-पॅसिफिक संकल्पना ही केवळ भौगोलिक संज्ञा न राहता एक व्यापक सामरिक चौकट म्हणून उदयास आली आहे. या संकल्पनेने भारत-चीन संबंधांना नव्या राजनीतिक, सामरिक व आर्थिक परिमाणांची जोड दिली आहे. भारताने द्विस्तरीय धोरण स्वीकारलेले दिसून येते-एकीकडे चीन सोबत संवाद व तणाव व्यवस्थापनाची भूमिका, तर दुसरीकडे बहुपक्षीय व त्रिपक्षीय सहकार्याच्या माध्यमातून संतुलन साधण्याचा प्रयत्न. भारताचे 'Act East' धोरण आणि इंडो-पॅसिफिक संकल्पना या व्यापक रणनीतीचा भाग आहेत. दक्षिण पूर्व आशियाई देशांशी वाढते संबंध आणि आसियानच्या केंद्रीयतेचा स्वीकार हे भारताच्या समावेशक प्रादेशिक दृष्टिकोनाचे निदर्शक आहेत.

भारताने अमेरिका, जपान व ऑस्ट्रेलिया यासारख्या राष्ट्रांसोबत वाढविलेली सामरिक भागीदारी विशेषतः क्वाडच्या पुनरुज्जीवनातून स्पष्ट होते.२०१७ नंतर क्वाड हे केवळ संवादमंच न राहता प्रादेशिक स्थैर्य, सागरी सुरक्षा आणि नियमाधिष्ठित व्यवस्थेच्या समर्थनासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. हे वास्तववादी दृष्टिकोनातून शक्तीसंतुलनाच्या प्रयत्नांचे उदाहरण मानता येईल. इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील आर्थिक परिमाणही तितकेच महत्त्वाचे आहे. चीनच्या व्यापारी प्रभावाला मर्यादा घालण्यासाठी भारताने पुरवठा साखळी विविध, स्वदेशी उद्योग वृद्धी आणि प्रादेशिक व्यापार भागीदारी यावर भर दिला आहे. भारतीय उद्योग संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्राने या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसते. समग्र विश्लेषणातून असे दिसून येते की भारत-चीन संबंध हे केवळ द्विपक्षीय तणावाच्या चौकटीत न पाहता व्यापक प्रादेशिक आणि जागतिक सत्तासंतुलनाच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. संघर्ष आणि सहकार्य यांचा समांतर प्रवाह, आर्थिक परस्परावलंबन आणि सामरिक स्पर्धा यांचा द्वंद्वात्मक संबंध, तसेच बहुपक्षीय संरचनांमधील सक्रिय सहभाग- या सर्व घटनांनी इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील नवे राजकीय वास्तव निर्माण केले आहे.

**शिफारशी-**

१) भारताने सागरी क्षमतावृद्धीवर अधिक भर द्यावा.

२) बहुपक्षीय सहकार्य मजबूत करून प्रादेशिक स्थैर्य वाढवावे.

३) सीमावर्ती व सामरिक प्रश्नांवर नियमित उच्चस्तरीय संवाद यंत्रणा अधिक बळकट करणे आवश्यक आहे, जेणेकरून तणाव नियंत्रणात राहील.

४) हिंद महासागरात पारदर्शकता, संयुक्त सराव आणि विश्वासवृद्धी उपाययोजना वाढविणे गरजेचे आहे.

५) QUAD,ASEAN आधारित मंच आणि इतर प्रादेशिक संघटनांमध्ये संतुलित व समावेशक भूमिका घेऊन भारताने सामरिक स्वायत्तता कायम ठेवावी.

**संदर्भ सूची-**

१) अरुण शौरी, भारत-चीन संबंध, प्रभात पब्लिकेशन.

२) के एस शर्मा, भारत-चीन संबंध बदलता परिदृश्य, एविंसपन पब्लिशिंग.

३) ए श्रीनिवास, द फ्युचर ऑफ इंडिया-चायना रिलेशन, फॉरेन अफेअर्स.

४) एबिगहाउजेन रोडियौन, हिंद-प्रशांत क्षेत्र मे चीन का बढता वर्चस्व, बी डब्ल्यू २०२३.

५) माया गुप्ता, भारत-चीन संबंध हिंद-प्रशांत क्षेत्र की उभरती चुनौतियो के विभिन्न आयाम, परेक्सिस आंतरराष्ट्रीय जर्नल ऑफ सोशल साईस अँड लिटरेचर,२०२२.

६) एन सागर, इंडो-पॅसिफिक में चीन और भारत, ओपी जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटी, २०२०.

७) हर्षवर्धन मृंगला, भारत की हिंद-प्रशांत नीती, द इंडियन एक्सप्रेस,२०२०.